२०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत जलमित्र पुरस्कारासाठी सुधारीत निधी वितरीत करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
### शासन निर्णय क्रमांकः मफुअ- २०१७/प्र.क्र.४१/जल-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ३ नोव्हेबर, २०१७

<u>ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक</u>

(१) जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४.
(२) मफुअ-२०१३ /प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक २८ सप्टेंबर, २०१६.
(४) मफुअ-२०१३ /प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक १५ एप्रिल, २०१७
(५) मफुअ- २०१७/प्र.क्र४१./जल-८ दिनांक २६ एप्रिल, २०१७
(६ ) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ व दिनांक ३० जून, २०१७
(७) शासन निर्णय क्र.मफुअ- २०१७/प्र.क्र४१./जल-८ दिनांक १४ सप्टेंबर, २०१७

<u>शासन निर्णय :</u>

राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ठ योगदान योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यास संदर्भाधीन दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा व विभागस्तरावरील गाव, तालुका, जिल्हा व पत्रकार यांचे पुरस्कार कार्यक्रम त्या त्या विभागात आयोजित करुन पुरस्कार प्रदान करण्यासाठी एकूण १०००.०० लक्ष निधी सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पित केला असून वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८/४/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये ८०% निधी वितरीत करण्यास मान्यता दिल्याने प्रत्यक्षात रु. ८००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास संदर्भाधीन दिनांक २६/४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ३०/६/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये ७०% मर्यादेत सदर निधी वितरीत करण्याच्या दिलेल्या सूचनेनुसार या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १४/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रु. ७००.०० लक्ष निधीच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आता वित्त विभागाने सदर प्रयोजनासाठी १००% निधी वितरीत करण्यास मान्यता दिलेली असल्याने उर्वरित निधीपैकी खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| विभाग | दिनांक २६/४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक विभागाला निश्चित केलेली रक्कम (रु. लाखात) | दिनांक १४/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक विभागाला वितरीत करण्यात आलेली सुधारीत रक्कम (रु. लाखात) | उर्वरित वितरीत करावयाची रक्कम (रु.लाखात |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| पुणे | रु. ४८.२५ | रु. ३६.१९ | रु.१२.०६ |
| कोकण | रु. ११५.२५ + *रु. २६६.०२=३८१.२७ (*राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी) | रु.८६.४४ + *रु.१९९.५२= रु. २८५.९६ (*राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी) | रु. २८.८१+ *रु.६६.५०= रु. ९५.३१ (*राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी) |
| अमरावती | रु. ११५.२५ | रु. ८६.४४ | २८.८१ |
| नाशिक | रु. ७६.७५ | रु. ५७.५७ | १९.१८ |
| नागपूर | रु. १२६.३७ | रु.९४.७८ | ३१.५९ |
| औरंगाबाद | रु. १४८.६१ | रु. १११.४६ | ३७.१५ |
| **एकूण** | **रु. ८९६.५०** | **रु.६७२.४०** | **२२४.१०** |

२. यापूर्वी संदर्भाधीन दिनांक १४/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये ७०% मर्यादेत रु. ७००.०० लक्ष निधी वरील परि. १ मधील विवरणपत्रातील रकाना ४ प्रमाणे सर्व विभागीय आयुक्तांना बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. वित्त विभागाने सदर पुरस्कारासाठी १००% म्हणजेच १०००.०० लक्ष वितरीत करण्यास दिलेल्या मान्यतेने उर्वरित ३० % म्हणजे रु. ३००.०० लक्ष निधीपैकी वरील रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व विभागीय आयुक्तांना निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. सदंर्भाधीन दिनांक २६/४/२०१७ व दिनांक १४/९/२०१७ च्या सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जलमित्र पुरस्कारासाठी निधी वितरणाच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबी, उपरोक्त बाबींव्यतिरिक्त कायम राहतील.

४. या पुरस्कार योजने अंतर्गत जलमित्र पुरस्कारासाठी करण्यात येणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेल्या निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**" मागणी क्र.एल- ३, २४०२-मृद संधारण (००)**
**१०२ मृद संधारण- (०४) मृद व जलसंधारण**
**(०४) (०१) महात्मा ज्योतिबा फुले जल मित्र पुरस्कार (२४०२ १०३७ ) ०५, बक्षिसे "**

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.४५६/२०१७/व्यय-१५ दिनांक २३/१०/२०१७ तसेच वित्त विभागाच्या अर्थ१७ कार्यासनाच्या दिनांक २/११/२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०१७११०३१७२५३८५०३१२६** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Machhindranath R Shelke

Digitally signed by Machhindranath R Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=422bf862d9fee2734c8e15a0366a265ee1ac1ad3cf944f3bc14563fa5e2610b5, cn=Machhindranath R Shelke
Date: 2017.11.03 17:25:53 +05'30'

**(म. रं. शेळके)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद व विधानसभा यांचे सचिव,
४. मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
६. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
७. कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
८. मुख्य सचिव यांचे सहसचिव,
९. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०.प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५.सामाजिक वनीकरण वृत्ते,
१६.सर्व मुख्य संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७.सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१८.मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१९.प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२०.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२१.सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२२.सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,

२३.सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२४.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२५.सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२६.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२८.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२९.सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०.सर्व सहसंचालकवनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३२.महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३३.महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३४.महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६.सर्व मंत्रालयीन विभाग,
३७.कृषि व पदुम विभाग (राकृवियो कक्ष), मंत्रालय, मुंबई
३८.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३९.सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई